Volume 10 (Special Issue 4)
January, 2020

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

**A Multidisciplinary International Level Refereed Journal**

COSMOS
IMPACT FACTOR
4.270




२६ जानेवारी २०२०

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त...

# संशोधन पद्धती

# Research Methodology

**Editor : Dr. R.V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

| | | | |
|---|---|---|---|
| 83 | सचिन प्रकाशराव देशमुख<br>डॉ. आर. व्ही. म्हस्के | संशोधनाचा अर्थ व आदर्श संशोधकाचे आवश्यक गुण | 275-277 |
| 84 | प्रा. रामप्रसाद मोहनराव व्हडगीर | ऐतिहासिक संशोधनातील वस्तुनिष्ठता व तथ्यांचे विश्लेषण | 278-279 |
| 85 | डॉ. एस. डी. खैरनार<br>प्रा. ए. एन. वळवी | संशोधनात प्राचीन, ऐतिहासिक दस्तऐवज आणिपुरातत्वशास्त्रीय साधनांचे महत्त्व | 280-282 |
| 86 | प्रा. कैलास बुधा वाघ | संशोधन अहवाल (स्वरुप व आशय, वैशिष्टये) | 283-284 |
| 87 | जयेश रामदास ब्राम्हणे<br>प्रा.डॉ. दिनकर एस. कळंबे | आदर्श संशोधन पद्धतीमध्ये मुलाखत तंत्राचे फायदे व तोटे : एक अभ्यास | 285-288 |
| 88 | प्रा. विजय पंडित सुर्यवंशी | शैक्षणिक संशोधनासाठी संगणकीय सुविधांचा उपयोग | 289-291 |
| 89 | Mr. Ghatage Jayant Chandrakant | Sampling Technique and Types of Sampling | 292-294 |
| 90 | Dr. Mahadeo Sadashiv Disale | Research Report Writing : A Critical Study | 295-297 |
| 91 | Patil Jayashri Ramrao | A study of Effectiveness of Experiential Learning on Achievement of English Subject at Primary Level | 298-300 |
| 92 | Dr. Uttam V. Nile<br>Prof. RupeshR. Deore &<br>Dr. Sandip. S. Bhavsar | How To Write Research Report ? | 301-305 |
| 93 | Dr. Hemant Sudhakar Dalal | Comparative Literature | 306-307 |
| 94 | संतोष गंगाराम रौंदळ | "संशोधन आराखडा : प्रकार आणि महत्व" | 308-309 |
| 95 | स.प्रा.कु. रंजना एच. आडे | संशोधन आराखडा व प्रकार | 310-313 |
| 96 | डॉ. दिपक लोटन सुर्यवंशी | मराठीतील साहित्य संशोधन | 314-316 |
| 97 | प्रा.डॉ. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | "संशोधनात गृहीतकृत्याचे महत्व आणि उपयुक्तता" | 317-319 |
| 98 | प्रा.डॉ.एस.जी.गोल्डे<br>लक्ष्मण महारू राठोड | संशोधनाचे प्रकार व वैशिष्ट्ये | 320-321 |
| 99 | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | "संशोधन स्वरूप व दिशा" | 322-324 |
| 100 | श्रीमती कामिनी रामदास पवार<br>डॉ. संजय एस. शिंदे | वैज्ञानिक संशोधन पध्दती | 325-327 |

# "संशोधनात गृहीतकृत्याचे महत्व आणि उपयुक्तता"

प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते (मराठी विभाग प्रमुख)
विद्या विकास मंडळाचे,कला व वाणिज्य महाविद्यालय अक्कलकुवा जि.नंदुरबार

## प्रास्ताविक :-

संशोधन ही एक सत्यशोधनाची प्रक्रिया असते. त्यात विशिष्ठ विषयाचा योग्य पद्धतीने अभ्यास करणे गरजेचे असते. तसेच संशोधनाचे एक शास्त्र असते. त्यात निवडलेल्या विषयाचा अभ्यास करतांना त्यासंबंधी ज्ञानाची सुसंगत मांडणी करणे गरजेचे असते, यालाच शास्त्र म्हणता येईल. संशोधनाची प्रक्रिया सूरु असतांना उदभवलेल्या समस्यांचे निराकरण करणे आवश्यक असते. त्यासाठी केलेल्या प्रयत्नातून संशोधन सुरू होते. संशोधन करणारी व्यक्ती समस्या सोडविण्यासाठी लागणारी आवश्यक ती माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण करते. त्यातून निष्कर्ष काढून स्वतः समाधान करून घेत असतो. संशोधन चांगले व निर्दोष होण्यासाठी अभ्यासक संशोधकाला अचूक माहितीचे अवलोकन करून योग्य निष्कर्ष काढणे गरजेचे असते. त्यासाठी समस्येचे निराकरण करतांना आलेले अनुभव संभाव्य घटनांचा घेतलेला आढावा, योग्य आखणी करून, प्रश्नांची उत्तरे शोधन्यासाठी असलेली उत्सुकता, योग्य व निर्दोष निरिक्षणे या सर्व बाबींचा योग्य मेळ घालता आला तर संशोधन योग्य दिशेने करता येईल. यासर्व बाबी शास्त्रीयसंशोधनात महत्वाच्या असतात.

संशोधकाला वाङ्मयिन, सामाजिक, शास्त्रीय व अन्य कोणत्याही विषयातून संशोधन करावयाचे असते. त्यासाठी त्याला वस्तुनिष्ठ आराखड्याशिवाय संशोधन करणे शक्य नाही. संशोधन करतांना नवीन ज्ञान किंवा उपयुक्त माहिती मिळवून तिचा योग्य उपयोग करणे महत्वाचे असते. पण मिळवलेली माहिती विश्वसनीय साधनांपासून मिळवलेली असावी तसेच संबंधीत विषयावर यापूर्वी काही काम झाले किंवा कसे ते पाहणेही महत्वाचे असते. माहिती तर्कशुद्धता व वस्तुनिष्ठता असणे गरजेचे आहे. साहित्याच्या संशोधना संदर्भात विचार केल्यास साहित्य हा अत्यंत महत्वाचा व विश्वसनीय असा सामाजिक संकल्पनांचा आधार असतो.कित्येक वर्षे आधी निर्माण झालेल्या परंतु आजही अस्तित्वात असलेल्या जुन्या संकेतांच्या, कल्पनांच्या व विचारांच्या आधारे नवा अर्थ, नवा आशय साहित्यात पाहवायास मिळतो. साहित्य हे समकालीन मानवी विचारांवर, मनावर, संस्कृतीवर वेगळा प्रभाव टाकण्याचे काम करते. उदा. सर्वप्रकारचे संत वाङ्मय पंडिती काव्य, शाहिरी वाङ्मय, लोकसाहित्य, ग्रामीण-दलित साहित्य इत्यादी. दु.का.संत आपल्या "संशोधनपद्धती, प्रक्रिया व अंतरंग" या ग्रंथातून संशोधनाची व्याख्या करतांना म्हणतात की, "एखाद्या विशिष्ट विषया संबंधी विशिष्ट उद्देश मनात धरून आवश्यक ती माहिती मिळविण्याच्या साक्षेपी व पद्धतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय." ही व्याख्या यथार्थ वाटते. संशोधकाच्या अंगी कष्ट करण्याची क्षमता, विशिष्ट प्रकारची चिकित्सकता, पृथ्यःकरणक्षमता, तत्वशोधवृत्ती असली पाहिजे. संशोधकाने मिळवलेल्या तथ्यांचे महत्व ओळखून योग्य निष्कर्ष काढता आले पाहिजेत. अर्थात त्यासाठी संशोधकाने विविध शास्त्रीयपद्धतींचा वापर केला पाहिजे यालाच संशोधन म्हणतात. कारण वैज्ञानिक संशोधन हे अधिक तार्किक व वस्तुनिष्ठ असते संशोधन प्रक्रियेतील अत्यंत महत्वपूर्ण एक टप्पा म्हणजे गृहीतकृत्य होय. संशोधन कार्यातील गृहीतकृत्याचे महत्व समजून घेता येईल.

## गृहीतकृत्याचा अर्थ :-

संशोधन विषय निश्चित केल्यावर संशोधन कार्य यशस्वी पूर्ण करण्यासाठी संशोधकास काही विधान मांडावे लागतात. त्या आधारे संशोधक अनुमान काढतो. अशा विधानास संशोधानामध्ये गृहितक, गृहीतकृत्य, उपकल्पना, Hypothesis असे म्हणतात. गृहीतकृत्या मुळे संशोधनाला येग्य दिशा प्राप्त होते. व संशोधकाला पडलेल्या प्रश्नांची संभाव्य उत्तरांचा शोध घेता येतो. ज्या प्रश्नांचे उत्तर शोधण्यासाठी संशोधकाने कार्य सुरु केले असते. त्याला मिळालेले संभाव्य उत्तर म्हणजे गृहितक किंवा गहीतकृत्य होय. संशोधकाने बांधलेला अंदाज हा गृहीतकृत्याच्या माध्यमातून व्यक्त होत असतो. गृहितक हे विविध घटकातील परस्पर संबंध स्पष्ट करणारे विधान असते. एखादी घटना का घडत ती घडण्याच्या मागचे कारण कोणते शोध घेतांना संभाव्य घटनांच्या कारण्यापैकी पहिला भाग हा माहितीतला असतो तर नंतरचा भाग हा माहित

नसलेल्या घटकातील असतो. त्यामुळे एकाचा संबंध दुसऱ्या भागाशी येतो. म्हणजेच दुसऱ्या भागातील घटक हा पहिल्या वर अवलंबून असतो. उपकल्पना किंवा गृहितक हे एका पेक्षा जास्त घटकांवर अवलबून असतात.

संशोधन करतांना गृहीतकृत्याची निर्मिती हे संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट नसून सत्यशोधन हेच संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट असते. सत्य हे वास्तव तथ्याच्या सहाय्यानेच सापडते. गृहीतकृत्याच्या आधारे नाही. तर गृहीतकृत्य हे संशोधन विषयावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी अध्ययनाची दिशा ठरविण्यास मदत करते. गृहीतकृत्यांना खरे किंवा खोटे ठरविणे म्हणजेच शास्त्रीय संशोधन होय मात्र गृहीतकृत्य सत्यच ठरावेत असा आग्रह संशोधकाने धरता कामा नये.

गृहीतकृत्याचा व्याख्या :-

गृहीतकृत्य किंवा गृहीतकृत्याच्या व्याख्या करतांना अनेक तज्ञांनी वेगवेगळया पद्धतीने आपले विचार मांडले आहेत त्यांच्या विचारांमध्ये एकवाक्यता आढळून येत नाही. काही तज्ञांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) प्रा.लुंडबर्ग (Lundberg) यांच्या मते, "ज्यांची सत्यता अध्यापही पडताळवयाची आहे, अशा तात्पुरत्या व कामचलावू सामान्यी करण्यास किंवा निष्कर्षास गृहीतकृत्य असे म्हणतात. प्रारंभी गृहीतकृत्य ही कल्पना, कल्पनापूर्ण विचार, अनुमान, अंदाज किंवा अंत: प्रेरणा इ. पैकी काहीही असू शकते, परंतु पुढे ती संशोधन कृती किंवा अन्वेषणाचा आधार बनते."

२) गुड आणि हॅट :- यांचे मते, "गृहीत कृत्य अथवा उपकल्पना म्हणजे असे अनुमान की, जे तथ्य निरिक्षणावर आधारलेले असून ज्यामुळे भावी संशोधन कार्यास गती मिळते."

३) प्रा. ई. एस बोगार्डस यांचे मते, "परीक्षित केल्या जाणाऱ्या प्रस्तावाला गृहीतकृत्य असे म्हणतात."

४) प्रा. पॉलिन यंग :- यांच्या मते, " उपकल्पना म्हणजे ज्याच्या आधारे संशोधनकार्य करता येते असा कामचलाऊ विचार होय."

५) वेबस्टरचा शब्दकोश:-उपकल्पना किंवा गृहीतकृत्य किंवा गृहीतक म्हणजे गृहीत धरलेले विधान, तत्व किंवा अट होय."

६) प्रा. कोहेन व नॅगल :- यांच्या मते, " चौकशी किंवा संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक समस्येचे संभाव्य निराकरण किंवा उत्तर सुचविल्याशिवाय संशोधन कार्यात सुरवात करता येत नाही अशा समस्यांची संभाव्य उत्तरे अध्ययन विषयाच्या कोणत्यातरी पैलूमळे, पूर्वज्ञानामुळे सुचतात अशा उत्तरांचे जेव्हा विधानामध्ये रूपांतर केले जाते तेव्हा त्यास गृहीतकृत्य असे म्हणतात."

७) मॅक्स ब्लॅक :- "जे विधान निश्चित पणे बरोबर आहे की चूक आहे हे खात्रीपूर्वक माहीत असत नाही, त्या विधानाला गृहीतकृत्य असे म्हणतात. परंतु ते विधान बरोबर ठरल्यास त्याचे काय परिणाम होतील हे पाहण्यासाठी ते विधान तपासून पाहिले जाते."

८) डॉ. गंगाधर कायंदे -पाटील :- यांच्या मते, "ज्या विधानामुळे संशोधनाची उद्दिष्टे, हेतू साध्य होण्यास मदत होते. अशा विधानास उपकल्पना असे म्हणतात. हे विधान कामचलाऊ स्वरूपातील संशोधकाचे अनुमान असते.

वरील सर्व व्याख्या अभ्यासल्यानंतर दिसून येते की, गृहीतकृत्य ही संशोधन कार्यातील सुरवातीची किंवा प्राथमिक स्वरूपाची कल्पना असते. हा प्राथमिक विचारच तथ्य आणि घटना यांचा कार्यकारण भावात्मक शोध घेण्यास प्रेरणा देतो. सामाजिक शास्त्रातील संशोधनकार्यात गृहीतकृत्य उभे करावे लागतात.

गृहीतकृत्यांचे महत्व आणि उपयुक्तता :-

**१) गृहीतकृत्य हे संशोधनाची दिशा निर्धारित करते :-** गृहीतकृत्य हे संशोधनाचा पाया असते. गृहीतकृत्यामुळे संशोधकाला निश्चित विषयावर लक्ष केंद्रीत करता येते. त्यामुळे त्या अध्ययानाच्या योग्य दिशेने वाटचाल करता येते. संशोधनकर्त्याला गृहीतकृत्यामुळे काय करावे व काय करू नये याबद्दलची दिशा सापडते. तसेच कोणती माहिती व तथ्ये संकलित करून कशाप्रकारे परिक्षण करावे याबद्दलचे मार्गदर्शन मिळते गृहीतकृत्यामुळेच निरिक्षण कोणत्या उद्देशाने करावयाचे असते त्या बदलची दिशा मिळते.शास्त्रीय संशोधनात गृहीतकृत्य हे बीजरूप मानले जाते.

**२) संशोधनास निश्चितता प्रदान करते :-** सामाजिक घटना आणि तथ्यांचे क्षेत्र व्यापक असल्यामुळे संशोधकाला संशोधन विषयाच्या विविध पैलू एकाचवेळी अभ्यासणे अशक्य असते. जरी संशोधकाने तसा प्रयत्न केला तरी त्याला योग्य ज्ञान प्राप्त होणार नाही. परंतु गृहीतकृत्य हे निश्चित असल्यामुळे अध्यपनास निश्चितता प्राप्त होते. त्यामुळे संशोधकाला

नेमके काय करायचे आहे व कोणती तथ्य संकलित करायचे आहेत. याबद्दलची माहिती स्पष्टपणे मिळते. त्यामुळे संशोधन कार्यात यथार्थता वाढते व संशोधनकार्य मर्यादीत होऊन अध्ययन विषयाच्या निश्चित पैलूवर लक्ष केंद्रित करता येते. त्यामुळे संशोधन कार्यात निश्चितता येते.

**३) अध्ययन क्षेत्रास मर्यादित करणयास सहाय्यक :-** संशोधकाला आपले अध्ययन क्षेत्र मर्यादित करणे आवश्यक असते. सामजिक व शास्त्रीय अध्ययनाचे क्षेत्र विस्तृत असले तरी संशोधनकर्ता आपले लक्ष अभ्यास विषयाच्या विशिष्ट पैलू किंवा विशिष्ट बाबींवरच केंद्रीत करतो. संशोधनकर्ता जर सर्वच पैलूंचे संकलन करावायास लागला तर त्याला सखोल अभ्यास करणे शक्य होणार नाही. म्हणून गृहीतकृत्यामुळे संशोधनाचे क्षेत्र मर्यादित झाले तर त्यामुळे अचूकता साधली जाते.

**४) वेळ,पैसा व मनुष्यशक्तीची बचत :-** गृहीतकृत्य जर संशोधकाच्या डोळ्यासमोर नसेल तर तो अनावश्याक तथ्य गोळा करू लागतो. त्यामुळे अशा तथ्य संकलानामुळे वैळ, पैसा व श्रम अनावश्यक खर्ची पडतो. गृहीतकृत्यामुळे संशोधनाची व्याप्ती मर्यादित करून अध्ययनाची दिशा निश्चित केली जाते. त्यामुळे संशोधकाचा वेळ, पैसा व श्रमाचा अपव्यय टाळता येतो.

**५) निश्चित निष्कर्ष काढण्यास सहाय्यक :-** गृहीतकृत्याचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे योग्य तथ्य संकलन करणे होय. गृहीतकृत्यविना संशोधन करणे म्हणजे ध्येयाविना भटकणे होय. त्यामुळे काढलेले निष्कर्ष हे वस्तुस्थितीला धरून असण्याची शास्वती कमी असते. निश्चित ज्ञानापर्यंत नेणारे गृहीतकृत्य हे सिद्धांत व शोध यातील मध्यबिंदू होय. पी.व्ही. यंग यांच्या मते, "एका शास्त्रज्ञाकरिता सकारात्मक परिणाम जितके महत्वपूर्ण आहेत तितकेच नकारात्मक परिणामसुद्धा महत्वपूर्ण आहेत. दोन्ही परिस्थितीतून आपणास ज्ञान मिळते ते उपकल्पनेमुळेच शक्य होते."

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, संशोधनात गृहीतकृत्याची आवश्यकता किती महत्वाची असते. योग्य गृहीतकृत्य हे योग्य निष्कर्ष काढण्यास सहाय्यभूत ठरते. अनावश्यक व विसंगत बाबी या योग्य दिशा लाभाल्यामुळे सहज टाळता येतात. संशोधक हा प्रतिभासंपन्न असेल तर तो अचूक गृहीतकृत्ये मांडतो. त्याला नुसते ज्ञान असून चालत नाही तर त्याच्या आधारे गृहीतकृत्ये सुसंगतपणे मांडता आले पाहिजे. त्यासाठी संशोधकाला संशोधन पद्धतीचा अभ्यास असणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१) डॉ. वी. एम. कऱ्हाडे - शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपाळापूरे ॲण्ड कं. पाब्लिशर्स नागपूर
२) डॉ. दु. का संत - संशोधन पद्धती प्रतिक्रिया व अंतरंग, विध्यार्थीगृह प्रकाशन पुणे
३) डॉ. गंगाधर वि. कायंदे-पाटील - संशोधन पद्धती, संशोधनसिद्धांत आणि व्यवहार, सामाजिक शास्त्र संशोधन पद्धती. प्रकाशक चैतन्य पब्लिकेशन्स नाशिक-१३

-----------------------------*****-----------------------------

Impact Factor - 6.625

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue - 224 (E)

## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS




**Guest Editor :**
Dr. Mrs. M. V. Waykole
Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce College, Bhusawal, Dist Jalgaon.

**Executive Editor :**
Dr. A. D. Goswami
Vice Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce College, Bhusawal, Dist Jalgaon.

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
(Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | आज के संदर्भ में गाँधी चिंतन की उपादेयता | प्राचार्य डॉ. विश्वास पाटील | 05 |
| 2 | Rereading Non-violence : An African American Perspective | Dr. Smita Chaudhari | 10 |
| 3 | Mahatma Gandhi's Views on Women Empowerment for Social Change | Dr. Pramod Bhumbe | 14 |
| 4 | Metaphysics of Gandhiji | Smt. Monika Elker | 18 |
| 5 | महात्मा गांधीजी के आर्थिक विचार | डॉ. रमेश जोशी | 23 |
| 6 | प्रेमचंद की कहानियों में गांधीवादी विचारधारा | डॉ. प्रीति सोनी | 26 |
| 7 | महात्मा गांधी का राष्ट्रीय आंदोलन में योगदान १९१५-१९२० (खिलाफत एवं असहयोग आंदोलन के विशेष संदर्भ में ) | प्रा. अनुपम शर्मा | 29 |
| 8 | महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास | प्रा. दिपाली पाटील | 33 |
| 9 | महात्मा गांधींच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. राजेंद्र काकुस्ते | 37 |
| 10 | भारताच्या फाळणीत महात्मा गांधींची भूमिका : एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा. विजय साळुंखे | 40 |
| 11 | महात्मा गांधींचा ग्रामीण विकासाचा दृष्टीकोन | श्यामकुमार दुसाने, प्रो. शुभांगी राठी | 43 |
| 12 | महात्मा गांधींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान | प्रा. नानाजी भामरे | 46 |
| 13 | महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान : आजच्या काळाची गरज | डॉ. मनीषा वर्मा | 50 |
| 14 | महात्मा गांधींची ग्रामस्वराज्य संकल्पना | प्रा. विनोद भालेराव | 59 |
| 15 | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | सचिन कुंभार | 61 |
| 16 | महात्मा गांधींचे धर्मविषयक विचार | कु. तेजस्विनी आंबेकर | 64 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 224 (E) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# महात्मा गांधींच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव

**डॉ. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते**
मराठी विभाग प्रमुख
वि.वि.मं.चे कला व वाणिज्य महाविद्यालय,
अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार.

इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला आणि भारतावर इंग्रजांचे राज्य सुरु झाले. या इंग्रजी राजवटीत नव्या पध्दतीची शिक्षण व्यवस्था आस्तित्वात आली. नवशिक्षित तरुण पिढी इंग्रजी भाषा शिकू लागली. ही भाषा समाजाची नवी मानसिकता घडविण्यास कारणीभूत ठरली. इंग्रजांच्या आगमनाबरोबरच मुद्रणकलाही अस्तित्वात आली. त्यामुळे नवनवे विचारप्रवाह या नवशिक्षितांना समजू लागले. एकंदरीत या विचार क्रांतीचा परिणाम मराठी वाड्मयावर झाला.

पाश्चात्य शिक्षणाच्या पध्दतीमुळे इंग्रजी साहित्याचे नवे व वेगळे साहित्य प्रकार नवशिक्षित तरुणांच्या परिचयाचे झाले. त्याचा सुरुवातीचा परिणाम इंग्रजी साहित्याचा मराठी अनुवाद करणे हा होय. यातून इंग्रजीतील कथा, कविता, कादंबरी व नाटके यांचे भाषांतर होऊ लागले. त्यामुळे पाश्चात्य वाड्मय व त्यातील विचार या नवशिक्षितांना परिचयाचे झाले. याचा परिणाम १८८० नंतर इंग्रजी वाड्मयाच्या धरतीवर स्वतंत्रपणे नवे वाड्मय प्रकार लिहिले जाऊ लागले. उदा. निबंध हा १९२० पूर्वी नव्याने उदयास आलेला स्वतंत्र असा वाड्मय प्रकार होता.

१९२० ते १९८० या ६० वर्षाच्या काळात राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक, शैक्षणिकदृष्टया भारतात आणि महाराष्ट्रात खूपच बदल घडले. त्याचा कळत न कळतपणे वाड्मयावर परिणाम झाला. या कालखंडाचे इ.स. १९२० ते १९५०, १९५० ते १९८० या अशा दोन टप्प्यातून विभाजन करता येते. पहिला खंड हा स्वातंत्र्यापूर्व कालखंड आणि दुसरा स्वातंत्र्योत्तर कालखंड म्हणून मानला जातो. या पहिल्या कालखंडाच्या प्रारंभी लोकमान्य टिळकांच्या कालखंडात लढा दिला गेला. त्यांचे नेतृत्व हे जहालवादी विचारांचे होते. १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचे निधन झाले आणि महाराष्ट्रासह संबंध देशाचे नेतृत्व अहिंसावादी महात्मा गांधीकडे आले आणि त्यांनी या देशाचे नेतृत्व १९४८ पर्यंत म्हणजे सुमारे ३ दशकांपर्यंत केले. टिळक आणि गांधी यांच्या नेतृत्वात मुलभूत फरक म्हणजे गांधीजी सत्याग्रह, सविनय कायदेभंग यासारख्या अहिंसावादी मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कार्यरत होते. त्यामुळे गांधीजींच्या अहिंसावादी विचार सरणीने शाळा, कोर्ट, कचेऱ्या यावर बहिष्कार, सत्याग्रह, छोडो भारत, चले जाव ची घोषणा, १९४२ ची क्रांती, वंदे मातरम् यांसारख्या घोषणांनी देशात इंग्रज विरोधी वातावरण निर्माण झाले.

महाराष्ट्राचा विचार करतांना शंकरराव देव, साने गुरुजी, विनोबा भावे, सेनापती बापट, आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, न. वा. गाडगीळ, य. श. जोशी, केशवराव आणि ना. ग. गोरे इ. गांधीवादी विचारवंतांनी महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढयाची चवळवळ बहुजन समाजात खेडया-पाडयात तळागाळापर्यंत नेऊन पोहोचवली. गांधीजींच्या या चळवळीला सावकारांसारख्या हिंदुत्ववादी विचारवंतांचा विरोध होता. परंतु पुढे गोपाळकृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी, जवाहरलाल नेहरु, डॉ. आंबेडकर, डॉ. ॲनी बेझंट इ. नी गांधीजींच्या अहिंसावादी विचारसरणीत अनुकूलता दर्शविली. भाई डांगे यांनी १९२३ मध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. डॉ. आंबेडकरांचा उदय देखील याच कालखंडात झाला. थोडक्यात टिळकांच्या निधनानंतर १९५० हा कालखंड महात्मा गांधी व त्यांचे समर्थक, विरोधक यांच्या भिन्न-भिन्न राजकीय चळवळीत प्रभावित झालेला दिसून येतो.

'यथा राजा तथा प्रजा', 'राजा बोले दल हाले' या संज्ञेचा अर्थ राजकीय विचार सरणीत हे त्या-त्या कालखंडाला गांधीजींच्या राजकीय विचार सरणींने १९२० ते १९४८ या तीन दशकांचा कालखंड प्रभावित झालेला दिसून येतो. व्यक्ति आणि समाज जीवनात अनेक बाजू असतात. व्यक्ती ही समाज जीवनाचा अविभाज्य घटक असली तरी समाज जीवन

ISSN : 2348-7143
February-2020

प्रभावित करणाऱ्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक इ. विषयाशी परिस्थितीनुरुप परिणाम अपरिहार्यपणे त्याच्या कालखंडावर पडलेला दिसून येतो. या दृष्टीने विचार करता दलितोध्दार, अस्पृश्यता ह्या या कालखंडातील मुख्य समस्या होत्या. त्या निवारणासाठी महात्मा गांधी, विठ्ठलराव शिंदे, शि. म. परांजपे, अनंतराव गजरे, समता आनंद, सयाजीराव गायकवाड, ज्योतिबा फुले इ. दलित उध्दाराच्या चळवळीला पाठिंबा दिला.

गांधी युगाला प्रारंभ १९२० मध्ये झाला तरी महाराष्ट्रात गांधीजीचा प्रभाव पडू लागावयास दहा वर्षे जावी लागली. कथा, कादंबरी, नाटक इ. ललित वाङ्मयापेक्षाही वैचारिक निबंध वाङ्मयावर गांधीवादाचा थोडाफार परिणाम निःसंशय झाला. १९३० नंतरच्या काळात गांधीवादाचा प्रत्यक्ष अवलंब करणाऱ्या आणि विचारसरणी हाताळणाऱ्या निबंधकारांची एक परंपरा निर्माण झालेला आहे. आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, आचार्य जावडेकर, दादा धर्माधिकारी, न. वि. गाडगीळ, लक्ष्मणशास्त्री जोशी हे विचारवंत त्यात प्रमुख होते. प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेतही त्यांचा सहभाग होता आणि लेखणी, वाणीव्दारे गांधीवादाचा प्रसार हे त्यांचे एका अर्थी जीवितकार्य होते. विनोबा भावे हे तर महात्मा गांधीचे पहिले सत्याग्रही नंतर भूदान यज्ञाचे उद्‌गाते आणि सर्वोदय चळवळीचे प्रवर्तक मधुकर, जीवनदृष्टी, सिंहावलोकन इ. त्यांचे निबंध संग्रह उल्लेखनीय आहेत. सानेगुरुजी गांधीवादी विचार सरणीने प्रभावित झालेले होते. गांधीजींच्या विचार प्रणालीतील सेवाधर्म व अस्पृश्योव्दार यांनी त्यांचे संवेदनशील मन भारावून गेलेले होते. गांधी विचारातील सांस्कृतिक विचार त्यांनी मराठीत मांडला. भारतीय संस्कृती हा त्यांचा ग्रंथ या काळात विशेष चर्चिला गेला. एका अर्थी गांधीवादी दृष्टिकोनातून भारतीय संस्कृतीचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न त्यातून साने गुरुजींनी केला आहे.

स्वातंत्र्यापूर्व काळात गांधी आणि त्यांचे विचार यांचा थोडाफार प्रभाव मराठी लेखकांवर पडला होता. ललित साहित्यात कथा कादंबरीच्या क्षेत्रात गांधीवादी मूल्यांना महत्व देणारे साने गुरुजी हे प्रमुख लेखक होते. कु. प्रेमा कंटक यांचा मुख्य भर गांधीवादी मूल्यांच्या प्रस्थापनेवरच होता. वा. म. जोशी, इंदु काळे व सरला भोळे, वि. स. खांडेकर - क्रोंचवध, ययाती, मामा वरेरकर, पु. ल. देशपांडे, वामन चोरघडे, रघुवीर सामंत, महादेवशास्त्री जोशी वगैरे लेखकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्या काही कलाकृतीतून गांधीजींना अभिप्रेत असलेली जीवनमुल्ये मांडली आहेत. द. र. कवठेकर - आभाळाची सावली, वि. वा. शिरवाडकर - वैष्णव, जान्हवी, श्रीकृष्ण बिवलकर - सुनिता, श्रीपाद जोशी - विस्कटलेली घरटं, मी, भूमीपत्र, वावटळीतील पाने, मृणालिनी देसाई - 'पुत्र मानवाचा' यांसारख्या आणखी काही लेखकांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. वि. वा. शिरवाडकरांची क्रांतीच्या जयजयकारासाठी, अग्निसंप्रदायासाठी मानवतेचे निशाण मिरवण्यासाठी त्यांची विशेष ख्याती आहे. आपल्या 'वैष्णव' या कादंबरीत त्यांनी गांधी या व्यक्तीचा यथोचित गौरवही केला आहे. तसेच वैष्णव या कादंबरीतून गांधी चळवळीचे साद-पडसाद उमटलेलेही आढळतात. या कादंबरीला गांधीप्रणीत १९४२ च्या लढयाची पार्श्वभूमी आहे. नायक मूळचा एक सामान्य प्राथमिक शिक्षक. गांधींजींच्या चळवळीत तो कसा ओढला गेला, गांधींजींच्या चळवळीने त्याचा आंतरअग्नी कसा चेतविला गेला हे मुळात दाखवायचे आहे. कल्पनेच्या तीरावर या कादंबरीत ही गांधीवादाशी साधण्याचा मनःपूर्वक प्रयत्न केलेला आहे.

मराठी कथा प्रांतात वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे यांनी मध्यम वर्गेतर श्रमजीवी, कष्टकरी, शेतकरी अशा अनेकांचे जीवनानुभव कथेतून मांडले. लक्ष्मणराव सरदेसाई, वि. स. सुखठणकर इ. गोमतकीय लेखकांनी प्रादेशिक कथा लिहिल्या. विभावरी शिरुरकर, गीता साने, प्रेमा कंटक, मालतीबाई दांडेकर यांनी मध्यमवर्गीय जीवन चितारले आहे. तर खाडीलकरांनी द्रोपदी, त्रिदंडी संन्यास, सं मेनका ही नाटके लिहुन गांधीवादाचा पुरस्कार केला. वासुदेवशास्त्री खरे यांच्या उग्रमंगल या नाटकात टिळक -गांधी समन्वयाचा प्रयत्न आहे. श्री. ना. ताडपत्रीकर यांनी 'गांधी टोपी' या नाटकातून गांधी विचारांचा पुरस्कार केला. १९२४ मध्ये गांधींजींनी केलेल्या उपोषणावर आधारीत 'रामरहीम' हे नाटक वि. गो. शेटये यांनी लिहीले.

इ.स. १९२० ते १९५० हा मराठी वाड्मयाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा कालखंड होय. याच कालखंडात अनेक राजकीय घडामोडी घडल्या आणि या घडामोडींचा परिणाम मराठी वाड्मयावर झाला. राजकीयदृष्ट्या या कालखंडाची सुरुवात लोकमान्य टिळकांच्या निधनाने आणि म. गांधींच्या उदयाने झाली. या ३० वर्षात पूर्वीच्या कोणत्याही काळापेक्षा अधिक वेगाने आणि व्यापक स्वरुपाच्या राजकीय घटना घडल्या. या राजकीय घटनांचा परिणाम सहाजीकच त्या काळातील मराठी साहित्यावर उमटलेला दिसून येतो. इ.स. १९२० पर्यंत असे अनेक विचार प्रवाह मराठी वाड्मयावर परिणाम करणारे ठरले. पण पुढे १९४७ पर्यंतचा हा कालखंड तुलनेने क्षीणप्रभ वाटतो. कारण १९२० नंतर पाश्चात्य विचारांचा प्रभाव काहीसा कमी झाला. त्याला कारणीभूत ठरली ती गांधीवादी विचार प्रणाली. शिक्षणामुळे लोकांच्या वैचारिक प्रबोधनला सुरुवात झाली. ब्रिटिशांच्या ढोंगीपणाला शह देण्यासाठी त्यांच्या विरुध्द प्रबोधन सुरु झाले. समाज साहित्याभिमुख बनला. गांधीवादी साहित्याचा परिणाम समाजावर पडु लागला आणि समतेसाठी, राजकीय स्वातंत्र्यासाठी आपण लढले पाहिजे ही विचारसरणी जागृत झाली. त्याचा परिणाम म्हणजे १९४२ चे ब्रिटीश विरोधी भारतीयांनी उभारलेले उग्र आंदोलन आणि त्यानंतर मिळालेले स्वातंत्र्य होय. देशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु बॅरिस्टर जीना आणि इंग्रजांच्या कुटील नितीमुळे देशाचे विभाजन झाले. निर्वासितांचा प्रश्न निर्माण झाला. ३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजींची हत्या झाली.

आपल्या देशातील बहुसंख्य जनता गांव-खेडयात राहते. त्यांच्यात जागृती कराण्यासाठी म. गांधीजींनी खेडयाकडे चला असा संदेश दिल्यावर राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांसोबत साहित्यिक ही खेडयाकडे वळले व त्यांनी खेडयातील जनजीवन जवळून अभ्यासल्यामुळे तेथील वास्तव जीवन साहित्यातून चितारले जाऊ लागले. त्यातून प्रादेशिक, ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली. त्यात रा. वि. टिकेकर (धनंधारी), श्री. म. भाटे, आनंद यादव, शंकर पाटील इ. ग्रामीण व प्रादेशिक साहित्यिकांनी ग्रामीण जीवन रहाटीचा ठसा आपल्या ग्रामीण साहित्यातुन उमटवला आहे. १९६० नंतर मोठया प्रमाणावर ग्रामीण व दलित साहित्य लिहीले जाऊ लागले. त्यावरही गांधीजींच्या विचारांचाच प्रभाव पडल्याचे जाणवते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, इंग्रजांकडून मिळालेल्या शैक्षणिक सुविधा यामुळे घडलेले वैचारिक प्रबोधन. या प्रबोधनातून निर्माण झालेले साहित्य विचार प्रवाह उदयास आले. महत्मा गांधीजींच्या विचारांचा परिणाम मराठी वाड्मयावर मोठया प्रमाणात झाला असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**संदर्भ सूची :-**

१) आधुनिक भारताचा इतिहास :- प्राचार्य डॉ. जी. बी. शहा, प्राचार्य डॉ. बी. एन. पाटील
२) आधुनिक मराठी वाड्मयाचा इतिहास - भाग-१ व २, अ. ना. देशपांडे
३) प्रदक्षिणा भाग-१ व २
४) वाड्मयाच्या कालखंडाचा अभ्यास - संपादक डॉ. उषा मा. देशमुख
५) समीक्षेतील नव्या संकल्पना - संपादक डॉ. मनोहर जाधव

Volume - 10 (Issue - 6)

April, 2020


ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR

5.13



Editor : Dr. R.V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | डॉ. शरद मधुकर कुलकर्णी | जागतिक शांतता व सुरक्षितता | 69-71 |
| 20 | आशिष गुलाबसिंग वसावे<br>प्राचार्य डॉ. संजय एस. शिंदे | भाषिक कौशल्ये व त्यांचा विकास | 72-76 |
| 21 | डॉ. राजेंद्र बाविस्कर | रांगेय राघव के 'घरौंदे' उपन्यास में सामाजिक यथार्थता | 77-79 |
| 22 | डॉ.महादेव सदाशिव डिसले | शिक्षक-शिक्षण कार्यक्रमांतर्गतील प्रशिक्षणार्थींची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारधाराविषयक अभिरुची - एक अभ्यास | 80-82 |
| 23 | डॉ. विजय जी. गुरव | विनोद रस्तोगी के नाटकों में सामाजिक चेतना | 83-86 |
| 24 | प्रा.डॉ. अरुण उखा पाटील | नंदुरबार जिल्ह्याच्या कृषी विकासात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे योगदान | 87-89 |
| 25 | प्रा.डॉ.राहुल पुरुषोत्तम मेघे | भारतातील साम्राज्य विस्तारात ब्रिटिश लष्करी व्यवस्थेची भूमिका | 90-93 |
| 26 | प्रा.डॉ. अनिल विठ्ठल बाविस्कर | महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणांविषयीचे विचार | 94-97 |
| 27 | प्रा.डॉ. व्ही.बी. माळी | जैविक धोका आणि मानवी सुरक्षा | 98-101 |
| 28 | प्रा. सुनिता संतोष पवार | स्त्री चळवळ | 102-103 |
| 29 | प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता | 104-106 |
| 30 | प्रा.डॉ. सुनिल व्ही. कुवर | नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बालकांमधील कुपोषण - एक समस्या | 107-110 |
| 31 | प्रा.डॉ. राजधर चैत्राम बेडसे | निरामय व दीर्घायुषी जीवन जगण्यात समतोल आहार व शरीरश्रमाचे महत्त्व | 111-113 |
| 32 | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | आंबेडकरवादी कवी : डॉ. यशवंत मनोहर | 114-119 |
| 33 | प्रा.साळवे कल्पना सुदास | संशोधनाचे स्वरूप, व्याप्ती व टप्पे | 120-124 |
| 34 | प्रा. डॉ. प्रतिभा दीपक सूर्यवंशी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार | 125-127 |
| 35 | अर्चना अ. वणीकर | संशोधन अहवाल : मूल्यमापन आणि निकष | 128-130 |
| 36 | प्रा. सुभाष लक्ष्मण भालेराव | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'स्वराज्य' या बद्दलचे विचार | 131-133 |
| 37 | प्रा.डॉ.सौ. विजया विठ्ठल बाविस्कर | आनंदी जीवनाचे मुलभूत आधार | 134-136 |
| 38 | प्रा. धिरज अविनाश शेलार | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील धुळे विभागाच्या कर्मचारी कल्याण योजनांचा / उपक्रमांचा अभ्यास | 137-140 |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता

प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते (मराठी विभाग प्रमुख)
विद्या विकास मंडळाचे,कला व वाणिज्य महाविद्यालय अक्कलकुवा जि.नंदुरबार - ४२५४१५ (महाराष्ट्र)

## • प्रास्ताविक -

आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास करतांना लक्षात येते की, अव्वल इंग्रजीच्या काळात महाराष्ट्रातील तत्कालिन सुशिक्षित अभ्यासकांना प्रेरणा देण्याचे काम वृत्तपत्रांनीच केले आहे. मराठी वृत्तपत्र सृष्टीत लोकमान्य टिळक, गो.ग. आगरकर, शि.म. परांजपे, न.चिं. केळकर, कृ.प्र. खाडीलकर, कोल्हटकर इ. सारख्या नामवंत वृत्तपत्रकारांचीच नावे ठळकपणे दिसून येतात. वृत्तपत्र हे लोकजागृतीचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. असे मानणारे अस्पृश्य समाजाचे शाश्वत चित्रण आपल्या प्रभावी लेखणीने ठामपणे मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत यासारखे वृत्तपत्र सुरू करून ते चालविले. त्यातून प्रभावी लेखन केले. समाजातील जनतेला जागे करून आपल्या विचारांनी प्रभावित केले. त्यांना अस्तित्वाची जाणीव करून दिली. असे असले तरी मराठी वाङ्मयाच्या इतिहासात 'पत्रकार आंबेडकर' म्हणून त्यांच्या पत्रकारितेची दखल पाहिजे तेवढी घेतली गेलेली दिसत नाही. काही निवडक अभ्यासक, मीमांसकांनी बाबासाहेबांच्या वृत्तपत्रीय कार्याचा अभ्यास थोड्याफार प्रमाणात केलेला दिसतो. त्यांच्या चरित्रकारांनी चरित्र ग्रंथात वृत्तपत्रासंबंधी दिलेली माहिती, दलित व अस्पृश्यांच्या चळवळी संदर्भात अत्यंत महत्त्वाची बाब मानली पाहिजे.

## • डॉ. आंबेडकरपूर्व दलित पत्रकारितेचे स्वरूप -

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' चा पहिला अंक प्रकाशित केला. त्यापूर्वी शिवराम जानबा कांबळे (सोमवंशीय मित्र), गोपाळबाबा वलंगकर यांच्यासारखे काही अस्पृश्य पत्रकार वृत्तपत्रातून लिखाण करत होते. साधारणतः त्यांच्या लिखाणामागची भूमिका ही समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, अस्पृश्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्या उन्नतीसाठी ब्रिटीश सरकार व हिंदू समाज यांचे विनंती करून मन वळविणे, वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या उत्थानासाठी त्यांच्या कर्तृत्वाची व अस्मितेची जाणीव करून देणे, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक प्रश्नांचे महत्त्व समजावून देणे, हिंदू समाजातील सामाजिक दोष दाखवून अस्पृश्यांना सामाजिक गुलामगिरीची जाणीव करून देऊन त्यापासून मुक्तीसाठी प्रसंगी सामंजस्याने तर कधी लढा देऊन प्रयत्न करावेत. प्रसंगी इंगज सरकारला अर्ज विनंतीही करावेत. याबाबतची माहिती तत्कालीन वृत्तपत्रातून छापली जात असे. सामाजिक प्रबोधनाच्या या चळवळीत ह्या पत्रकारांना स्वराज्याच्या प्रश्नापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक गरजेचा व तीव्रतेचा वाटत असे. त्यामुळे सामाजिक सुधारणा व प्रबोधन हाच त्यांच्या चळवळीचा आणि वृत्तपत्र लेखनाचा उद्देश होता.

## • डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य -

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० मध्ये मूकनायक, १९२७ मध्ये बहिष्कृत भारत, १९३० मध्ये जनता आणि १९५६ मध्ये जनतेतेच रूपांत प्रबुद्ध भारत अशी चार वृत्तपत्रे सुरू केलीत. बाबासाहेबांच्या वृत्तपत्रांच्या बाबतीत डॉ. गंगाधर पानतावणे आपल्या 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथात म्हणतात की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या 'मूकनायका' ने 'बहिष्कृत भारता'तील 'जनते'ला 'प्रबुद्ध भारता'ची ओळख करून दिली आणि महाराष्ट्रात आणि मराठीत दलितांच्या पत्रसृष्टीला एक नवी दिशा व नवे सामर्थ्य प्राप्त झाले."

### १) मूकनायक -

वृत्तपत्र हे विचार मांडण्याचे व समाज प्रबोधनाचे प्रभावी साधन असते. म्हणूनच बाबासाहेबांनी आपल्या समाजाच्या प्रबोधनासाठी व आपले विचार मांडण्यासाठी स्वतःचे एक वृत्तपत्र असावे या विचारातूनच 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. हे वृत्तपत्र सुरू करण्याचे कारण असे की, इंग्रज सरकारने १९१७ साली 'साऊथबरो कमिशन' हिंदुस्थानातील विविध जाती-जमातींची मताधिकाराविषयक चौकशी करण्यासाठी नेमले होते. या कमिशनने काही महत्त्वाच्या ठिकाणी जाऊन काही महत्त्वाच्या लोकांची साक्ष नोंदवून घेतली होती. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर सरकारी महाविद्यालयात

प्राध्यापक असल्यामुळे त्यांना कमिशनने साक्ष देण्यासाठी निमंत्रीत केले नव्हते. कारण त्यांचा तोपर्यंत कोणत्याही सार्वजनिक व सामाजिक संस्थेशी संबंध नव्हता. तरीही त्यांनी अस्पृश्यांच्या हक्कासंबंधी काही मागण्या साऊथबरो कमिशनकडे आपण करावयात या उद्देशाने गव्हर्नरकडे पत्रव्यवहार करून कमिशनपुढे साक्ष देण्याची विनंती केली व ती गव्हर्नरने मान्य केल्यावर अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ तसेच वार्षिक उत्पन्नाची अट न घालता निवडणुकीस उभे राहण्याचे स्वातंत्र्य यासारख्या काही मागण्या कमिशनकडे केल्या. त्यांच्या लक्षात आले की, अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे वृत्तपत्रे असावीत. त्यांच्या हिताची चर्चा करणारे, हिंदू धर्माच्या सामाजिक, मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणारे व प्रबोधन करणारे एखादे वृत्तपत्र असावे या विचारातूनच ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले आणि समाजकारण व राजकारणात सक्रीय होण्याआधीच त्यांनी वृत्तपत्र सृष्टीत प्रवेश केला. मूकनायकचा जन्म हा अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाला नवचेतना देणारा ठरला. तसेच 'मूकनायक' हे अस्पृश्यांना विचार मांडण्याचे हक्काची एक जागा मिळाली. बाबासाहेब वृत्तपत्राकडे अस्पृश्यांना त्यांच्या अस्तित्वाची व भवितव्याची जाणीव करून देणारे साधन म्हणून पहात. 'मूकनायक' हे नाव फार अर्थपूर्ण होते. बाबासाहेबच अस्पृश्य, बहिष्कृत, मूक समाजाचे नेतृत्व करत होते. म्हणून हे नाव सार्थ वाटते. सुरूवातीच्या १२ अंकात बाबासाहेबांनी स्वतः अग्रलेख लिहीले होते. पण ते सिडनेहॅम या सरकारी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करीत असल्यामुळे त्यांनी पांडूरंग भटकर या सुशिक्षित अस्पृश्य तरूणांवर मूकनायकची संपादकाची जबाबदारी टाकली होती. बाबासाहेब विलायतेला पुढील शिक्षणासाठी गेले. त्यांच्या मागे व्यवस्थापकीय मंडळीने जबाबदारीने काम पुढे चालू न ठेवल्यामुळे १९२३ साली 'मूकनायक' कायमचे बंद पडले. बाबासाहेबांना त्यांनी सुरू केलेले वृत्तपत्र अल्पावधीतच बंद पडल्यामुळे खूप दुःख झाले.

२) बहिष्कृत भारत -

बाबासाहेबांनी दि. ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केलेले दुसरे पाक्षिक होय. मार्च महिन्यात महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन भरले तेव्हा बहिष्कृतांच्या चळवळीच्या प्रचारासाठी वृत्तपत्राची गरज वाटू लागली. या गरजेतून 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरू केले. हे वृत्तपत्र महत्त्वाचे ठरले कारण बाबासाहेबांनी स्वतः अभ्यासपूर्ण लिखाण केले. फक्त एक जात किंवा वर्ग एवढ्यापुरता विचार न करता चळवळीचा सखोल अभ्यास करण्यासाठी ह्या वृत्तपत्रातील लिखाण महत्त्वाचे आहे. यात विचार-विनिमय, बहिष्कृत वर्गाच्या कुलाबा जिल्हा परिषदेचे इतिवृत्त, सभांची माहिती, विविध विषय संग्रह, पत्रव्यवहार, आत्मपरिचय, सुबोध वचने या विविध सदरांबरोबरच 'आजकालचे प्रश्न' या विषयावरही संपादकाचे विचारमंथन छापले जात असे. बाबासाहेबांचे अग्रलेखातून तर्कशुद्ध विचारांचे खंडन मंडन, युक्तिवाद, समर्थक सुभाषिते, अवतरणे, डौलदार व आवेशपूर्ण भाषा इ. बरोबरच कोणत्याही विषयाची सर्व बाजूने चिकित्सा केलेली असे. काही लेखातून त्यांनी जहालवादी व हिंदू धर्मातील सामाजिक प्रथांवर टिका केली. अस्पृश्यांवर होणारे अन्याय-जुलूम पाहिला व अनुभवल्यामुळे अस्पृश्यांची बाजू मांडतांना बाबासाहेब आक्रमक होतात. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी 'बहिष्कृत भारत' ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. मात्र वृत्तपत्राला वर्गणीदार फारसे न मिळाल्यामाळे, बाबासाहेबांनी वर्गणीदार व्हावे असे आवाहन करून देखील त्याचा फारसा परिणाम झाला नाही. त्यामुळे १५ नोव्हेंबर १९२९ चा अंक काढून आर्थिक अडचणीमुळे बहिष्कृत भारत बंद पडले. तरी बाबासाहेबांच्या सर्व पत्रात बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र महत्त्वाचे ठरले.

३) जनता -

'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत' ही दोन्ही वृत्तपत्रे अल्पायुषी ठरलीत. पण २४ नोव्हेंबर १९३० रोजी सुरू केलेले 'जनता' हे वृत्तपत्र दीर्घकाळ चालले. या पत्राचे प्रथम संपादक म्हणून देवराम विष्णू नाईक या पुरोगामी विचारांच्या, अस्पृश्यांच्या चळवळीत सक्रीय सहभाग घेणाऱ्या ब्राह्मण कार्यकर्त्याने काम पाहीले. सुरूवात पाक्षिक म्हणून झाली असली तरी पुढे साप्ताहिक म्हणूनच निघू लागले. जनताच्या शीर्षभागी "डॉ. भीमराव आंबेडकर, एम.ए., पीएच.डी., बार अॅट लॉ यांच्या नेतृत्वाखाली निघणारे पाक्षिक" असे असून 'जनता' या अक्षराखाली 'द पीपल' असे लिहिलेले असे. अस्पृश्य व पददलितांची दुःखे निर्भिडपणे मांडण्याची हमीच 'जनता' या वृत्तपत्राने दिली होती. या पत्राचे विशेष हे की, काही अंकानंतर शीर्षकाच्या मध्यभागी "गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल" हे ब्रीद वाक्य लिहीलेले असे.

बाबासाहेबांना असलेल्या इतर व्यापामुळे जनतात त्यांना सतत लिहीता आले नाही याची खंत त्यांना वाटत असे. तरीही सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर जेवढा भर होता तेवढाच धर्मांतराच्या संदर्भातील विचार त्यांनी जनतामध्ये प्रभावीपणे मांडले. या प्रश्नावर बाबासाहेबांनी वाचकांसाठी विलायतेतून लिहिलेली पत्रे ही वाचनीय असून तो त्यांचा एक

दस्तऐवजच आहे. 'जनता' जगवले पाहीजे अशी त्यांची इच्छा होती. म्हणूनच जनताचे स्वरूप व धोरणाविषयी ते वेळोवेळी मार्गदर्शन करत असत. राजकीय लढ्यासाठी व आपल्या स्वावलंबनासाठी आपले वर्तमानपत्रे भरभराटीस आणले पाहिजे. आज जरी त्याची किंमत फारशी वाटत नसली तरी भविष्यात त्याची जाणीव नक्कीच होईल अशी आंतरिक इच्छा बाबासाहेबांची होती. जनता पत्राचे आयुष्य २५ वर्षाचे असले तरी ते सलग कार्यरत नसून खंडीत होतांना दिसते. १९५५ पर्यंत विविध संपादकांच्या संपादनाखाली 'जनता'ची वाटचाल सुरू होती. भा.र. कद्रेकर, गं.नी. सहस्त्रबुद्धे, बी.सी. कांबळे, यशवंत आंबेडकर या संपादकांनी हे वृत्तपत्र चालवले.

### ४) प्रबुद्ध भारत -

४ फेब्रुवारी १९५६ रोजी 'जनता' चे 'प्रबुद्ध भारत' असे नामांतर करण्यात आले. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर 'प्रबुद्ध भारत' यशवंत आंबेडकर, मुकुंदराव आंबेडकर, दा.ता. रूपवते, शंकरराव खरात, भा.र. कद्रेकर इ. च्या संपादनाखाली चालवले जात होते. पुढे अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापन झाल्यावर 'प्रबुद्ध भारत' हे रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्रच बनले होते. परंतु संपादक मंडळ व राजकीय नेत्यांमध्ये बेबनाव निर्माण झाला. त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम 'प्रबुद्ध भारत'वर झाला. या वृत्तपत्रासाठी स्वतंत्र मुद्रणालय असून देखील १९६१ साली हे वृत्तपत्र बंद पडले, ही दुःखद बाब ठरली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय जीवनाचा प्रवास मूकनायक ते प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांच्या माध्यमातून झालेला आहे. अस्पृश्यांच्या चळवळींच्या इतिहासात त्यांच्या वृत्तपत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण त्यांनी सुरू केलेली ही वृत्तपत्रे त्या काळाची गरज होती. देशातील विविध चळवळी, घटना, घडामोडींचे भान ठेऊनच समाजस्थिती बदलण्यासाठी बाबासाहेबांनी या पत्रांच्या माध्यमातून जनजागृती केली होती. वैचारिक अंधारात चाचपडणाऱ्या समाजमनाला नवी दृष्टी, नवा विचार व दिशा देण्याचे कार्य या वृत्तपत्रांच्या माध्यमातूनच करता आले. हे करत असतांना बाबासाहेबांच्या डोळ्यापुढे फक्त अस्पृश्य समाजच नव्हता तर हिंदू समाजातील सामाजिक परिवर्तने, पुनर्रचनेचे आणि नव्या जगाचे चित्र निर्माण करायचे असल्याने समाज जीवनात विचारक्रांती निर्माण करून नवा समाज उभा करण्यासाठी वृत्तपत्रे हे मौलीक माध्यम असल्याने बाबासाहेबांनी वृत्तपत्रे सुरू केलीत व ती चालवलीत. म्हणूनच बाबासाहेबांचे वृत्तपत्रीय कार्य महत्त्वपूर्ण आहे.

- **संदर्भ ग्रंथ :-**

१) डॉ. गंगाधर पानतावणे - पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६
२) डॉ. एस.एस. गाठाळ - आधुनिक भारतातील सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळी, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, जून २०११
३) य.दि. फडके - आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी १९९०
४) द.न. गोखले - डॉ. आंबेडकरांचे अंतरंग, मौज प्रकाशन, मुंबई, जानेवारी २००३

------------------------------*****------------------------------